# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
## राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० <br> फॅक्स – ०२२ – २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


जा.क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती/ 93900 /२०२१
दि. ५ मे, २०२१

## सुचना

(संदर्भ : मे, २०२० जाहिरात - Programme Manager - Publich Health)

राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयामार्फत अभियानांतर्गत रिक्त पदे भरण्याकरीता दि. २० मे, २०२० रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र-अपात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार पात्र आक्षेप/हरकती विचारात घेऊन अंतिम पात्र-अपात्र उमेदवारांची यादीही प्रसिद्ध करण्यात आली होती. पात्र उमेदवारांच्या अर्जात नमूद माहितीच्या आधारे पुढील निकषांच्या आधारे गुणांकन करण्यात आले असून त्यानुसार तयार करण्यातआलेली गुणवत्ता यादी याद्वारे www.arogya.maharashtra.gov.in व www.nrhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| Criteria for selection | 1 | 60% Marks for marks obtained in the basic educational qualification i.e Graduation. |
| | 2 | 20% Marks for marks obtained in the additional educational qualification i.e. Post Graduation |
| | 3 | 20% Marks for experience calculated on monthly basis (Maximum 20 Marks) |

सर्व पात्र उमेदवारांना सुचित करण्यात येते की कृपया यादीचे अवलोकन करावे. याबाबत आपली काही शंका/हरकत असल्यास त्या फक्त **nhmrecruit.objection@gmail.com** या ईमेल आयडीवरच आवश्यक पुराव्यासह नोंदवाव्यात. अन्य कोणत्याही ईमेल आयडी वर पाठविलेली शंका/हरकत ग्राह्य धरली जाणार नाही व त्याची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच शंका/हरकतीच्या पृष्ठ्यर्थ सादर करावयाचा पुरावा फक्त पीडीएफ स्वरुपात सादर करावा. ईमेल मध्ये आपले संपुर्ण नाव व अर्ज केलेल्या पदाचे नाव स्पष्ट नमूद करावे. आपली हरकत/शंका कोणत्याही परिस्थितीत यादी प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत (दि. ७/५/२०२१ पर्यंत) वरील ईमेल आयडीवर पाठवावी. त्यानंतर प्राप्त होणारे ई-मेल विचारात घेतले जाणार नाहीत.

सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे गुणांकन करण्यात आले आहे. मुलाखतीच्या वेळेस किंवा प्रत्यक्ष नियुक्तीच्या समयी अथवा अन्य कोणत्याही वेळेस पात्र उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या व प्रमाणपत्रांच्या पडताळणीदरम्यान यामध्ये विसंगती आढळून आल्यास सदर उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील याची नोंद घ्यावी. तसेच कोणत्याही वेळी उमेदवाराकडे संबंधित पदाकरीता आवश्यक अर्हता नसल्याचे निष्पन्न झाल्यास त्याची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उपरोक्त पदभरतीच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणा-या सुचना, याद्या इत्यादी करीता www.arogya.maharashtra.gov.in व www.nrhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळांस नियमीत भेट द्यावी.

५/५/२०२१

सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई